दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०६ | अंक : ८५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०७ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

महायुतीसाठी धोक्याची घंटा! सरकारचा तो प्रस्तावित अध्यादेश बेकायदेशीर ठरेल

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०६, कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) अध्यक्ष निवडीवरून पेटलेल्या राजकीय आणि कायदेशीर संघर्षात एक नवीन वळण आले आहे. गोकुळच्या नवनिर्वाचित १३ बहुमतातील संचालकांच्या वतीने उच्च न्यायालयातील वकील ॲड. श्रीकृष्ण गणबावले यांनी माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्याकडून कायदेशीर सल्ला मागवला होता. नवनिर्वाचित बहुम ताला सत्तास्थापनेपासून रोखण्यासाठी शासननियुक्त व तज्ज्ञ संचालकांना मतदानाचा अधिकार देणारा अध्यादेश आणल्यास तो मनमानी कारभार आणि अधिकारांचा गैरवापर या कायदेशीर तत्त्वाखाली बेकायदेशीर ठरेल, असा स्पष्ट अभिप्राय माजी सरन्यायाधीशांनी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी नोंदवला असल्याचं सांगण्यात आलं आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे कोल्हापूर सर्किट बेंच येथील ॲड. श्रीकृष्ण गणबावले यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने २ नोव्हेंबर रोजी दिलेल्या आदेशात १० नोव्हेंबरला होणाऱ्या अध्यक्ष निवडीसाठी केवळ निर्वाचित २५ संचालकांना ७ दिवसांची नोटीस बजावण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यापूर्वी ३० ऑक्टोबरच्या सुनावणीत राज्य सरकार व विरोधी संचालकांनी या प्रक्रियेला संमती दिली होती. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून किंवा प्रलंबित याचिकेदरम्यान असा अध्यादेश आणणे हे थेट न्यायदानाच्या प्रक्रियेत हस्तक्षेप ठरेल. तसेच, अमूल संस्थेच्या एका प्रकरणात शासनाने नाम



निर्देशित सदस्यांना दिलेला मतदानाचा अधिकार उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला होता, असा महत्त्वाचा संदर्भ ॲड. गणबावले यांनी दिला आहे. अध्यक्षपदाच्या पहिल्या बैठकीसाठी कोणत्याही तांत्रिक कोरमची गरज नसून उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने निवडणूक पार पडते, असा मुद्दाही त्यांनी स्पष्ट केला.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम तील कलम 73AAA आणि कलम २७(९) नुसार स्वीकृत, तज्ज्ञ किंवा शासकीय प्रतिनिधींना अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांच्या निवडणुकीत मतदानाचा कोणताही अधिकार नाही. शासनाला अशा बाह्य सदस्यांना मतदानाचा अधिकार द्यायचा असल्यास मूळ कायद्यात व्यापक दुरुस्ती करावी लागेल. असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स या सर्वोच्च न्यायालयाच्या खटल्यातील तत्त्वाचा हवाला देत माजी सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, लोकशाही मार्गाने मिळालेल्या बहुमताला बाजूला सारण्यासाठी काढलेला अध्यादेश संविधानाच्या चौकटीत टिकू शकत नाही.

सत्तेचा पेच आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप...

गोकुळच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी सम विचारी आघाडीने २५ पैकी १३ जागांवर विजय मिळवून स्पष्ट बहुमत मिळवले आहे, तर सत्ताधारी महायुतीला १२ जागांवर समाधान मानावे लागले. मात्र, ४ नोव्हेंबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत ५ शासननियुक्त संचालक नेमून त्यापैकी ४ जणांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयावर आक्रमक होत सतेज पाटील यांनी गोकुळ अमूलच्या घशात घालण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याचा आरोप केला असून याविरोधात रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही गटांकडे स्वतंत्र कोरम उपलब्ध नसल्याची तांत्रिक बाब माजी सरन्यायाधीशांच्या निदर्शनास आणून दिली गेली नव्हती, असा दावा करत सरकारची भूमिका म ांडली आहे.

वरोऱ्यात तीन लाखांची लाच घेतांना ग्रामपंचायत अधिकारी व विस्तार अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

अक्षराज : वसंत वडस्कर



दि. ०६, वरोरा (चंद्रपूर) : शेतात बार अँड रेस्टॉरंटच्या बांधकाम परवानगीसाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या मोबदल्यात पाच लाख रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीनंतर तीन लाख रुपये स्वीकारणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी (६ नोव्हेंबर) रंगेहात पकडले. या प्रकरणात पंचायत समितीतील विस्तार अधिकाऱ्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे वरोरा पंचायत समिती व ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली आहे.

पांडुरंग निलकंठ पेंदे ४८ वर्ष , ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत नागरी, ता. वरोरा आणि प्रणव सुधाकर बक्षी ५१ वर्ष , विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती वरोरा अशी ताब्यात घेण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. विश्वसनीय सूत्राद्वारे प्राप्त माहितीनुसार, एका ३७ वर्षीय तक्रारदाराच्या व त्यांच्या भावाच्या नावे असलेल्या शेतात बार अँड रेस्टॉरंटचे बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक होते. हे प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या कामासाठी ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग पेंदे यांनी स्वतःसाठी आणि आपले वरिष्ठ अधिकारी प्रणव बक्षी यांच्यासाठी पाच लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

मात्र, लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने २ नोव्हेंबर रोजी चंद्रपूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या अनुषंगाने ४ नोव्हेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली. यावेळी तक्रारदाराने पांडुरंग पेंदे यांची वरोरा येथील आनंदवन चौकात भेट घेतली असता, त्यांनी पाच लाख रुपयांची मागणी कायम ठेवत तडजोडीनंतर तीन लाख रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविली. शुक्रवारी ६ नोव्हेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. पांडुरंग पेंदे यांनी सांगितलेल्या ठिकाणानुसार तक्रारदार मौजा खांबाळा येथे पोहोचला. यावेळी पेंदे यांनी तीन लाख रुपयांची लाच स्वीकारताच दबा धरून बसलेल्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणात प्रणव बक्षी यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, गुन्हा दाखल होताच दोन्ही अधिकाऱ्यांच्या अटकेची नोंद करण्यात येणार असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिली.

सदर कारवाई पोलीस उपअधीक्षक अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक तेजराम मेश्राम, पोलीस हवालदार हिवराज नेवारे, रविकांत इंगळे, पोलीस शिपाई अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदीप ताडाम, महेश माहुरपवार, महिला पोलीस शिपाई सीमा झाडे, चालक पोलीस शिपाई सतीश सिडाम तसेच चालक पोलीस शिपाई संदीप कवरासे मो.प.वि. चंद्रपूर यांनी केले.

कुटुंबातील तिघांचा भीषण अपघातात मृत्यू !

दि.०६, सोलापूर : सोलापूर-पुणे महामार्गावर मोहोळ तालुक्यातील तेलंगवाडी ते शेटफळ दरम्यान एका भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातात अन्य दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. शुक्रवार (दि. ६) रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास शेटफळ गावच्या हद्दीत हा अपघात घडला.पार्थ तुषार भारंबे (वय ८), विलास चांगु भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३, सर्व रा. कल्याण मुंबई) असे अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींची नावे आहेत. हे सर्वजण एकाच कुटुंबातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, इर्टिगा कार सोलापूर-पुणे महामार्गावरून प्रवास करत होती. भारंबे कुटुंब कल्याणहून अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनासाठी निघाले होते. मोहोळ तालुक्यातील शेटफळ गावच्या हद्दीत इर्टिका आणि कंटेनरची समोरासमोर धडक झाली. समोरून येणाऱ्या कंटेनरसोबत कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, कारचा चुराडा झाला असून कारमधील तिघांना आपला जीव जागीच गमवावा लागला.

स्वामींचे दर्शन अपूर्णच राहिले : अपघाताची भीषणता पाहून परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्य सुरू केले. भारंबे कुटुंब स्वामींच्या दर्शनासाठी अक्कलकोट कडे निघाले होते. वाटेतच मृत्यूने तिघांना कवटाळून घेतले. नागरिकांच्या मदतीने जखम ींना तातडीने उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या भीषण अपघामुळे सोलापूर-पुणे महामार्गावरील वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती. या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

दोन्ही NCP च्या विलिनीकरणावर तटकरेंचं मोठं विधान

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०६, मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी आता समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्य सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबद्दल मोठं तथा रोखठोक भाष्य केलं आहे. 'स्वर्गीय अजितदादा असते, तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसले असते', असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. ' अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली. मात्र, अजित पवार असते तर जी १२ फेब्रुवारी तारीख सांगितली जाते ती निश्चित झाली असती, आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र दिसल्या असत्या', असंही सुनील तटकरे म्हणाले. नुकतंच राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली होती. आता यानंतर सुनील तटकरे यांनी विलिनीकरणावर मोठं भाष्य केल्यानं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

सुनील तटकरे काय म्हणाले?

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची सध्या तरी कुठलीच चर्चा नाही. पण स्वर्गीय अजितदादा



असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसल्या असत्या. विलिनीकरणाची चर्चा त्यावेळी नक्की झाली होती. स्वर्गीय दादांनी मला त्याबाबतीत कल्पनाही दिली होती. कशाप्रकारे विलिनीकरणाची प्रक्रिया किंवा सूत्र असेल, हे त्यांनी मला त्यावेळी सांगितलं होतं. पण दुर्दैवाने अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली. दादा असते तर १२ फेब्रुवारी तारीख त्यावेळी म्हटलं जात होतं, तर दादांच्या प्रखर इच्छाशक्तीतून आणि त्यांनी ज्या काही बाबी त्यांनी जवळचा सहकारी म्हणून सांगितलं होतं, त्यामुळे ते घडेल हे नक्कीच होतं. परंतू दुर्दैवाने दादांच्या अपघाती निधनामुळे तो विषय त्याठिकाणी थांबला, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

शशिकांत शिंदे काय म्हणाले?

दरम्यान, याबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी तटकरेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. शशिकांत शिंदे म्हणाले की, सुनील तटकरेंनी सत्य परिस्थिती सांगितली. अजित पवार असताना विलिनीकरणाची चर्चा झाली होती. आज तटकरे म्हणत असले तरी आम्ही याबाबत यापूर्वीच बोलत होतो, पण ते मानलं जात नव्हतं. ते तटकरे साहेब बोलल्यामुळे त्यावर शिक्कामोर्तब झाला.

आज दोन्ही पक्ष एकत्र असते तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका तथा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकींचं चित्र वेगळं दिसलं असतं. दादांनाही तेच अपेक्षित होतं. पक्ष मजबुतीने ताकदीने उभा राहण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यायला हव्यात, हे शरद पवार आणि अजित पवारांना अपेक्षित होतं. त्यादृष्टीनेच विलिनीकरणाची चर्चा झाली होती, असं शशिकांत शिंदेंनी यावेळी म्हटलं आहे.

बाळासाहेबांच्या नावाचे कलादालन बंद ठेवणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या मंत्री सरनाईकांची चपराक

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.०६, मिरा-भाईंदर : हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने मिरा-भाईंदरम ध्ये उभारण्यात आलेले भव्य कलादालन राजकीय संकुचितपणापोटी बंद ठेवण्याच्या सत्ताधाऱ्यांच्या षढयंत्राला महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या आक्रमक आणि कृतीशील भूमिकेने धूळीस मिळवले आहे. प्रशासकीय दिरंगाई आणि खर्चाच्या नावाखाली बाळासाहेबांच्या नावाचा वारसा डावलणाऱ्यांना उघडे पाडत, मंत्री सरनाईक यांनी कलादालनाच्या संचालनासाठी दरमहा १० लाख रुपयांचा खर्च स्वखर्चाने उचलण्याची घोषणा करत विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकवून दिली आहे. एका बाजूला लोककल्याणासाठी स्वतःची तिजोरी खुली करणारे मंत्री आणि दुसऱ्या बाजूला केवळ राजकीय द्वेषापोटी शहराचा विकास रोखणारे सत्तेतील लोकप्रतिनिधी, असा सार्थ फरक आता मिरा-भाईंदरच्या जनतेसमोर आला आहे.

दिवाळीच्या सणात लहान मुलांना आणि विद्यार्थ्यांना या वास्तूचा लाभ व्हावा यासाठी त्यांनी दिवाळीच्या सुट्ट्यांम ध्ये १५ दिवसांकरिता मोफत कलादालन सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश महापालिकेला मागील आढावा बैठकीत दिले होते. आज मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रत्यक्ष कलादालनाला भेट देत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कलादालनाचा आनंद लुटू दिला. यावेळी मिंर-भाईंदर महानगरपालिका संबंधित अधिकारी देखील उपस्थित होते. अत्यंत आक्रमक भूमिका घेत मंत्री सरनाईक यांनी जाहीर केले की, जर महापालिकेला या वास्तूची देखभाल करणे आर्थिकदृष्ट्या परवत नसेल, तर दरमहा येणारा अंदाजे १० लाख रुपयांचा खर्च मी माझ्या स्वखर्चातून देईन. ही रक्कम पुढील महिन्यापासून थेट महापौर निधीत जमा केली जाईल. मात्र त्याच वेळी, कलादालन



चालविणे पालिकेला अशक्य असल्याचे महापौरांनी लेखी स्वरूपात द्यावे, अशी कायदेशीर व प्रशासकीय कोंडी ही त्यांनी निर्माण केली आहे. बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या या वास्तूवर टाच आणण्याचे प्रत्येक षढयंत्र त्यांनी आपल्या या धाडसी निर्णयाने उधळून लावले आहे.

भ्रष्टाचाराचा जप करणाऱ्यांनो, आधी आत्म परीक्षण करा!

कलादालनाच्या कामात कथित भ्रष्टाचार झाल्याचा थयथयाट करत ते बंद ठेवणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर मंत्री सरनाईक यांनी अत्यंत धारदार शब्दांत तोफ डागली. ज्यांचे हात भ्रष्टाचाराच्या विळख्यात मोजले जातात, त्यांना अशा उच्चस्तरीय वास्तूवर बोलण्याचा नैतिक अधिकार कोणी दिला? असा सज्जड सवाल त्यांनी केला. प्रत्यक्ष धोरणात्म क कामे करायची नाहीत, प्रकल्पांच्या मार्गात कायम अडथळे आणायचे आणि काम पूर्ण झाल्यावर शेफारून त्याचे श्रेय लाटण्यासाठी पुढे यायचे, हीच या मंडळींची जुनी कार्यपद्धती राहिली आहे. मंत्री सरनाईक यांनी शहरात आणलेली कोट्यवधी रुपयांची विकासकामे जनतेच्या डोळ्यांत भरू नयेत, म्हणूनच हा संपूर्ण हेटाळणीचा खेळ सुरू असल्याचा घणाघात त्यांनी केला.

क्लस्टर पासून मेट्रोपर्यंत; श्रेय घेणाऱ्यांची दुर्दैवी मानसिकता!

मागील तीन वर्षांत सत्तेच्या जोरावर क्लस्टर योजनेला कडाडून विरोध करत १७८ हून अधिक भूमिहीन व गरीब कुटुंबांना बेघर ठेवण्याचे पाप नेमके कोणाचे, हा प्रश्न आज ऐरणीवर आला आहे. मंत्री सरनाईक यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करून 'मिनी क्लस्टर'चा अध्यादेश मिळवून दिल्यानंतर आता श्रेयाची लाट उठवण्यासाठी हीच मंडळी पुढे धावत सुटली आहेत. मेट्रोचे जाळे असो, शहराचा जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न असो वा जुन्या व धोकादायक इम ारतींचा पुनर्विकास असो प्रत्येक ठिकाणी सरनाईक यांनी आपल्या कर्तृत्वाचा व दूरदृष्टीचा ठसा उमटवला आहे. आज सत्तेत असूनही स्वतःच्या ताकदीवर एकही मोठा प्रकल्प मार्गी लावता न आल्याने, या मंडळींची मानसिक अवस्था अशी झाली आहे की, उद्या त्यांच्या घरात काहीही चांगले-वाईट घडले तरी त्यांना त्यामागे प्रताप सरनाईकच दिसतील.

या संपूर्ण प्रकरणावर बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले कि, शहराच्या विकासासाठी घाम गाळायचा आम्ही, त्यात काटे पेरायचे तुम्ही आणि काम फत्ते झाल्यावर त्याचे श्रेय लाटण्यासाठी पुढे यायचे तुम्ही, हा नीच खेळ आता मिरा-भाईंदरमध्ये खपवून घेतला जाणार नाही. आदरणीय हिंदुहृयदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या नावावरील कलादालनाला जिवंत ठेवण्यासाठी आणि त्याची अस्मिता टिकवण्यासाठी स्वखर्चातून हे कलादालन चालवून दाखवेन. फक्त महापौरांनी मला पत्र द्यावेत कि कलादालन चालवण्याकरिता महापालिकेची आर्थिक परीस्थित नाही. केवळ तिजोरीच्या फुटक्या मडक्याचे कारण देऊन वास्तू बंद ठेवणारे संकुचित प्रवृत्तीचे सत्ताधारी या दोघांमधील हा फरक आता सुज्ञ आणि जाणकार जनतेने अचूकपणे ओळखला आहे.



पश्तुन समुदायाचा संताप

पाकिस्तान वरवर एक राष्ट्र म्हणून दिसत असले, तरी प्रत्यक्षात तो आतून खोलवर विभागलेला देश आहे. त्याच्या राजकारणावर लष्कर आणि पंजाबी सत्ताकेंद्रांचे निर्विवाद वर्चस्व आहे. पंजाब, सिंध, खैबर-पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान हे पाकिस्तानचे चार प्रमुख प्रांत. त्यापैकी बलुचिस्तानातील लोक मनाने कधीच पाकिस्तानशी पूर्णपणे एकरूप झाले नाहीत. तिथे पाकिस्तानचे अस्तित्व प्रामुख्याने लष्कर आणि आयएसआयच्या बळावर टिकले आहे. आता खैबर-पख्तुनख्वातही पाकिस्तान सरकार आणि लष्कराविरोधातील असंतोष उघडपणे दिसू लागला आहे.

या असंतोषामागे वर्षानुवर्षे साचलेली उपेक्षा, विकासाचा अभाव आणि राज्यकर्त्यांविषयीचा अविश्वास आहे. अफगाणिस्तानला लागून असलेला खैबर-पख्तुनख्वा हा अत्यंत संवेदनशील प्रांत. अनेक दहशतवादी संघटना येथे सक्रिय आहेत. त्यात तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) सर्वाधिक सक्रिय आणि भयावह मानली जाते. टीटीपीला 'पाकिस्तान तालिबान' असेही म्हटले जाते. अफगाण तालिबान आणि टीटीपी यांच्यातील संबंध अफगाण सरकार नाकारत असले, तरी त्यांच्यातील जवळीक सर्वश्रुत आहे.

काही दिवसांपूर्वीपर्यंत या प्रांतात माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाचे सरकार होते. दहशतवादविरोधी लढ्यात खैबर-पख्तुनख्वा सरकार पुरेसे सहकार्य करत नाही, असा आरोप करून पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सरकारने ११ ऑक्टोबर रोजी या प्रांतात आणीबाणी लागू केली आणि सरकार बरखास्त केले. इम्रान खान स्वतः पश्तुन आहेत. त्यामुळे या निर्णयाला केवळ सुरक्षा नव्हे, तर ठळक राजकीय संदर्भही आहे.

आणीबाणी लागू होताच मुख्यमंत्री महंमद साहिल आफ्रिदी, माजी मुख्यमंत्री गंडापूर आणि इतर अनेकांना अटक झाली किंवा नजरकैदेत ठेवण्यात आले. या कारवाईमागील खरे कारण राजकीय असल्याचे अनेकांचे मत आहे. पाच ऑगस्ट २०२३ पासून इम्रान खान तुरुंगात आहेत. तरीही त्यांची लोकप्रियता कमी झालेली नाही; उलट पाकिस्तानात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्याबद्दल सहानुभूती वाढताना दिसते. त्यांच्या प्रकृतीबद्दलही चिंता व्यक्त केली जात आहे. काही माजी क्रिकेटपटूंनी, त्यात भारतातील काहींचाही समावेश आहे, इम्रान खान यांना तुरुंगात चांगली वागणूक आणि योग्य वैद्यकीय सेवा मिळावी, अशी मागणी केली आहे.

खैबर-पख्तुनख्वातील लोकांमध्ये विकास न झाल्याची तीव्र भावना आहे. तेथील पश्तुन समाजासमोरचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत चालले आहेत. तरुणांचे अपहरण, बनावट चकमकी, आयएसआयकडून होणारा छळ, मानवाधिकारांचे उल्लंघन आणि टीटीपीची दहशत या साऱ्यांनी समाजात असुरक्षिततेची भावना वाढवली आहे.

या वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत टीटीपीच्या हल्ल्यांत पोलिसांसह १७०२ लोक मारले गेले. गेल्या वर्षी हा आकडा २३५९ होता. टीटीपीच्या मुद्द्यावरून पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही तणाव वाढत आहे. दोन्ही देश एकमेकांवर हवाई हल्ले करत आहेत. पाकिस्तान लढाऊ विमानांचा वापर करतो, तर अफगाणिस्तान ड्रोनचा वापर करतो. अफगाण सरकारने टीटीपीला मदत थांबवावी, अशी पाकिस्तानची मागणी आहे; तर टीटीपीशी आपला काही संबंध नसल्याचे अफगाणिस्तानचे म्हणणे आहे. काव्यगत न्याय असा, की ज्या पाकिस्तानने तालिबानला वाढवले, त्याच तालिबानचा प्रभाव आता पाकिस्तानसाठी आव्हान बनला आहे.

१५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानने काबुलवर ताबा मिळवला, तेव्हा इम्रान खान पाकिस्तानचे पंतप्रधान होते. त्या वेळी त्यांनी अफगाण जनता खऱ्या अर्थाने गुलामगिरीतून मुक्त झाली, असे वक्तव्य केले होते. नंतर तालिबानमधील अंतर्गत मतभेदांमुळे सरकार स्थापन होण्यात अडचणी येत असताना आयएसआयचे तत्कालीन प्रमुख फैझ हमीद काबूलला गेले आणि त्यांनी तालिबान नेत्यांशी चर्चा केली. या घटनांवरून पाकिस्तान आणि तालिबान यांचे संबंध किती गुंतागुंतीचे आहेत, हे स्पष्ट होते.

- जतिन देसाई

दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी साहित्याची पर्वणीच!

दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण आपल्या देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दिवाळीच्या आगमनाने बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, मिठाई, फटाके, नवीन कपडे, वाहने आणि विविध इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी होत आहे. आनंदी वातावरणात दिवाळी साजरी होत असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. दिवाळी म्हटले की फटाके, फराळ, आकाशकंदील आणि नवीन कपडे यांची जशी आठवण होते, तसेच दिवाळी आणि दिवाळी अंक हेही एक अतूट समीकरण आहे.

दिवाळी जवळ आली की साहित्यप्रेमी वाचकांना वेध लागतात ते विविध दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या खरेदीसोबतच पुस्तकांच्या दुकानांकडे वाचकांची पावले वळू लागतात. महाराष्ट्रात दिवाळी अंकांची परंपरा अतिशय समृद्ध आणि जुनी आहे. १९०९ मध्ये 'मनोरंजन' या नियतकालिकाने पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला. तेव्हापासून सुरू झालेली ही साहित्यपरंपरा आजही तितक्याच उत्साहाने सुरू आहे. दरवर्षी महाराष्ट्रात विविध विषयांवरील शेकडो दिवाळी अंक प्रकाशित होतात.

दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी साहित्याची मेजवानीच! कथा, कविता, कादंबरी, विनोद, व्यंगचित्रे, राजकारण, अर्थकारण, कला, क्रीडा, सामाजिक प्रश्न, शिक्षण, आरोग्य, विज्ञान आणि संस्कृती अशा विविध विषयांचा समृद्ध खजिना



दिवाळी अंकांमधून वाचायला मिळतो. नामवंत साहित्यिकांपासून नवोदित लेखकांपर्यंत अनेकांना आपल्या लेखनकौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम दिवाळी अंक करतात. अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके आणि स्वतंत्र प्रकाशकही दरवर्षी दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित करतात. त्यामुळे दिवाळीच्या फराळासोबतच दिवाळी अंक हा साहित्यप्रेमी कुटुंबांच्या आनंदाचा अविभाज्य भाग बनला आहे.

कोरोना महामारीच्या काळात दिवाळी अंकांच्या प्रकाशनावरही मोठे संकट आले होते. छपाई, वितरण आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक प्रकाशकांना अंक प्रकाशित करणे कठीण झाले होते. मात्र, अशा प्रतिकूल परिस्थितीतही काही संपादक आणि प्रकाशकांनी हार न मानता ऑनलाइन माध्यमातून दिवाळी अंक वाचकांपर्यंत पोहोचवले. पीडीएफ स्वरूपातील अंक आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वाचनाची परंपरा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. आता परिस्थिती पूर्वपदावर आल्याने मुद्रित दिवाळी अंकांनाही पुन्हा चांगले दिवस आले आहेत. त्याचबरोबर डिजिटल आणि ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपातील दिवाळी अंकही वाचकांच्या भेटीला येत आहेत. बदलत्या काळानुसार दिवाळी अंकांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे, ही समाधानाची बाब आहे.

दिवाळी अंक हे केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत, तर ते आपल्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करणारे महत्त्वाचे माध्यम आहे. वाचनसंस्कृती रुजवण्यात आणि ती समृद्ध करण्यात दिवाळी अंकांचे योगदान मोठे आहे. विशेषतः नव्या पिढीला पुस्तकांकडे आकर्षित करण्यासाठी दिवाळी अंकांचा उपयोग होऊ शकतो. आज मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा परिस्थितीत मुलांना आणि तरुणांना दर्जेदार दिवाळी अंकांची ओळख करून देणे आवश्यक आहे.

यंदाच्या दिवाळीत आपण मित्रपरिवार, नातेवाईक आणि प्रियजनांना मिठाई, फराळ आणि भेटवस्तू देतानाच एखादा दर्जेदार दिवाळी अंकही भेट द्यावा. ही भेट केवळ कागदांची किंवा पुस्तकांची नसून ज्ञानाची, विचारांची आणि साहित्यिक आनंदाची असेल. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा बौद्धिक फराळही प्रत्येक घरात पोहोचला पाहिजे. कारण दिवाळीचा आनंद केवळ दिव्यांच्या प्रकाशात आणि फराळाच्या गोडव्यात नाही, तर ज्ञानाच्या प्रकाशात आणि साहित्याच्या सहवासातही दडलेला आहे. दिवाळी अंकांचे वाचन वाढले, तर वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होईल आणि मराठी साहित्यविश्वाची परंपराही अधिक बहरत राहील.

- श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

नरक चतुर्दशी ! नरक बाहेर नाही, आपल्या सवयींतही असतो

नरक चतुर्दशी म्हटली की पहाटेचे अभ्यंगस्नान, सुगंधी उटणे, सुगंधी तेल, नवीन कपडे आणि फटाक्यांचा आवाज आठवतो. दिवाळीतील या दिवसाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. नरकासुराचा वध करून श्रीकृष्णाने जनतेला भयमुक्त केले, अशी कथा सांगितली जाते. अंधारावर प्रकाशाचा, दुष्ट प्रवृत्तीवर सद्विचारांचा आणि अन्यायावर न्यायाचा विजय हा या दिवसाचा संदेश मानला जातो.

पण या कथेचा अर्थ केवळ पुराणातील एका राक्षसाच्या वधापुरता मर्यादित ठेवायचा का?

दुष्काळी दिवाळी

संयमित साधे पणानी
साजरीयंदास दिवाळी
भलतीचं आक्रस्ताळी
रे परिस्थिती दुष्काळी

सामुदायिक महोत्सवे
घालवे आपत्ती काळी
एकपणती कैक वाती
तिमिरजळे अवकाळी

वांझ पणा अकारणचं
लागे भूमातेच्या भाळी
काळ्याढगांचीदडणूक
पांढ-या फट् आभाळी

पाऊस पसार अवचित
रे बाड बिस्तरा गुंडाळी
अधिक उग्र होय काळ
पिकवूलागला कंडाळी

ढगाचीकामे आम्हीकरे
सातत्ये आसवां ढाळी
उघडी पडलीत ती मुळे
वाळून उन्मळी ढहाळी

एक दुजांना सावरायचे
कठीण परिक्षेच्या वेळी
लढाद्यायचा एकजूटीने
ओळखेसंकटाचीखेळी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६



की आपल्या आजच्या जीवनातील नरकासुरांना ओळखण्याची संधी म्हणूनही त्याकडे पाहता येईल?

आज आपल्या सभोवतालचे अनेक प्रश्न आपणच निर्माण केले आहेत. रस्त्यांवरील कचरा, नद्यांमधील सांडपाणी, हवेत मिसळणारा धूर, प्लास्टिकचा वाढता वापर, अन्नाची नासाडी, ध्वनीप्रदूषण आणि निसर्गसंपत्तीचा अमर्याद उपभोग ही समस्या केवळ प्रशासनाची नाही. आपल्या रोजच्या वागण्याशीही तिचा थेट संबंध आहे. आपण घरात स्वच्छता ठेवतो; पण घराबाहेर कचरा टाकतो. स्वतःच्या घरात दुर्गंधी नको असते; पण कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकताना संकोच वाटत नाही. आपल्या घराजवळ शांतता हवी असते; पण सणाच्या नावाखाली इतरांना त्रास होईल एवढा आवाज निर्माण करण्यास आपण मागेपुढे पाहत नाही.

मग नरक नेमका कुठे आहे? तो केवळ एखाद्या अंधाऱ्या जागेत किंवा पौराणिक कथेत नाही. तो आपल्या असंवेदनशील सवयींतही निर्माण होतो. जेव्हा आपल्या कृतीमुळे दुसऱ्याचे जीवन अस्वस्थ होते, जेव्हा आपल्या सोयीसाठी निसर्गाचे नुकसान होते आणि जेव्हा आपण स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारण्यास नकार देतो, तेव्हा आपणच आपल्या सभोवतालचे वातावरण जगण्यासाठी कठीण बनवत असतो.

नरक चतुर्दशीला पहाटे उठून अभ्यंगस्नान करण्याची परंपरा आहे. शरीराची स्वच्छता आणि आरोग्य यांना या विधीत महत्त्व दिले जाते. मात्र, शरीर स्वच्छ ठेवण्याबरोबरच आपण ज्या वातावरणात राहतो, ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही स्वीकारायला हवी. स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, स्वच्छ परिसर आणि सुरक्षित अन्न या गोष्टी आरोग्याचा अविभाज्य भाग आहेत. केवळ सुगंधी साबण वापरून शरीर स्वच्छ होते; पण प्रदूषित हवा श्वासातून शरीरात गेली तर आरोग्याचे काय?

आज शहरांमध्ये वाढती धूळ, वाहनांचा धूर, औद्योगिक उत्सर्जन आणि कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन यांचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. दुसरीकडे, गावांमध्येही पाण्याचे प्रदूषण, रासायनिक पदार्थांचा अतिरेकी वापर, प्लास्टिकचा पसारा आणि जंगलांवरील वाढता ताण दिसतो. विकास आवश्यक आहे; परंतु विकासामुळे निर्माण होणाऱ्या परिणामांची जबाबदारी स्वीकारणेही आवश्यक आहे.

सणांच्या काळात कचऱ्याचे प्रमाण वाढते. आकर्षक सजावटींचे साहित्य, प्लास्टिकची वेष्टने, एकदाच वापरली जाणारी भांडी, फुलांचे अवशेष आणि अन्नाची नासाडी यांमुळे कचरा व्यवस्थापनावर ताण येतो. आपण वस्तू खरेदी करताना तिच्या वापराचा आनंद घेतो; परंतु तिचे पुढे काय होईल याचा विचार करत नाही. वस्तू वापरून फेकून देणे ही सवय सोयीची वाटत असली तरी तिचा परिणाम दीर्घकाळ टिकू शकतो. फटाक्यांचा प्रश्नही याच संदर्भात समजून घ्यायला हवा. सण साजरा करण्याचा आनंद महत्त्वाचा आहे; पण त्यातून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, प्राणी आणि पक्ष्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेणेही आवश्यक आहे. मोठ्या आवाजामुळे आणि धुरामुळे निर्माण होणारा त्रास हा केवळ काही तासांचा विषय नाही. ज्यांना ध्वनी आणि वायुप्रदूषणाची संवेदनशीलता अधिक आहे, त्यांच्यासाठी तो गंभीर अनुभव ठरू शकतो. उत्सवाचा आनंद दुसऱ्याच्या वेदनेवर उभा राहू नये.

नरक चतुर्दशीची खरी शिकवण आपण आपल्या कृतींशी जोडली तर या दिवसाला नवा अर्थ मिळेल. घरातील अनावश्यक वस्तू बाजूला काढताना त्यांचा योग्य पुनर्वापर करणे, ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवणे, अन्न वाया जाऊ न देणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या साध्या कृतींनी सुरुवात करता येते. आपल्या घरातील दिवे लावताना विजेचा सुज्ञ वापर करणे, सजावटीच्या वस्तू पुढील वर्षी वापरण्यासाठी जपून ठेवणे आणि खरेदीपूर्वी गरजेचा विचार करणे यांतूनही जबाबदार जीवनशैली निर्माण होऊ शकते.

आपल्या संस्कृतीत स्वच्छतेला केवळ बाह्य स्वरूप नाही. मन, विचार, वर्तन आणि परिसर या सर्वांची शुद्धता महत्त्वाची मानली गेली आहे. दुसऱ्याच्या हक्काचा आदर करणे, सार्वजनिक जागा आपल्याच घराचा विस्तार समजणे आणि निसर्गातील इतर जीवांनाही जगण्याचा अधिकार आहे हे मान्य करणे, हीदेखील स्वच्छ विचारांची लक्षणे आहेत.

नरकासुराचा वध ही कथा आपण दरवर्षी ऐकतो. परंतु आपल्या सवयींमधील अपव्यय, निष्काळजीपणा, असंवेदनशीलता आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणारी वृत्ती यांच्यावर विजय मिळवण्याचा प्रयत्न आपण करतो का? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

नरक निर्माण करणाऱ्या कृती आपणच करीत असू, तर त्यातून मुक्त होण्याची सुरुवातही आपल्यालाच करावी लागेल. प्रशासनाची व्यवस्था, कायदे आणि सुविधा आवश्यक आहेत; पण नागरिकांचा सहभाग नसेल तर कोणतीही व्यवस्था पूर्ण यशस्वी होऊ शकत नाही.

या नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नानाने शरीर स्वच्छ करूया; पण त्याचबरोबर आपल्या सवयींचेही आत्मपरीक्षण करूया. कारण खरा विजय केवळ अंधार दूर करण्यात नाही, तर आपल्या कृतींमुळे इतरांच्या जीवनात अंधार निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात आहे.

आपण दिवाळीत घरातील अंधार दूर करतो; यंदा आपल्या वर्तनामुळे निर्माण होणारा सामाजिक आणि पर्यावरणीय अंधारही दूर करण्याचा संकल्प करूया.

- विजयकुमार कट्टी
७९७७५१३८२२

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

विसापूर शेतशिवारात वाघाची दहशत

शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण; एका शेतकऱ्याची कालवड केली ठार



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०६, विसापूर (चंद्रपूर) : बल्लारपूर तालुक्यातील विसापूर आणि नांदगाव (पोडे) शेतशिवारात मागील ४-५ दिवसांपासून वाघाचा वावर असल्याचे दिसून येत आहे. अशातच आज शुक्रवारी सकाळी विसापूर येथील शेतकरी मधूकर भोयर याची कालवड (गोरा) वाघाने ठार केल्याची घटना उघडकीस आली. यामुळे शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतशिवारात वाघाच्या मुक्त संचाराने शेतकरी व शेतमजूरांत दहशत वाढली असून वन विभागाने वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. जिल्ह्यात ग्रामीण भागात मानव व वन्यजीव संघर्षाच्या घटना दररोज घडत आहे. अशातच मागील चारपाच दिवसांपासून विसापूर व नांदगाव (पोडे) येथील शेतकऱ्यांना व शेतमजूरांना शेतशिवारात वाघाचे दर्शन घडत आहे. याची माहिती वन विभागाला देण्यात आली होती. मात्र, वन विभागाने मधुकर भोयर याची कालवड वाघाने ठार केल्यावर घटनास्थळी धाव घेतली. यामुळे वन विभागाच्या कार्यशैलीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. आजघडीला शेती हंगाम सुरू आहे. कापूस वेचायला शेतमजूर शेतशिवारात जात आहे. शेतीशी संबंधित कामासाठी शेतकऱ्यांना शेतशिवारात जावे लागत आहे. अशातच वाघाचा मुक्त संचार शेतशिवारात होत आहे. यातून मानव- वन्यजीव संघर्षातून जीव हानी होण्याची शक्यता आहे. वन विभागाने वाघाचा बंदोबस्त करण्याची उपाययोजना करावी, अशी आग्रही मागणी विसापूर व नांदगाव (पोडे) परिसरातील शेतकरी व शेतमजूरांनी केली आहे.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी ठाण्यातील 'अष्टविनायक चौक' दिवाळी उत्सव रद्द

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०६, ठाणे : राज्यातील बिकट दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी-सर्वसामान्य नागरिकांवर ओढवलेले संकट लक्षात घेता, शिवसेनेने यंदा एक संवेदनशील आणि आदर्श निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, ठाण्यातील कोपरी येथील प्रसिद्ध 'अष्टविनायक चौक'चा यंदाचा दिवाळी उत्सव रद्द करण्यात आला आहे.

या उत्सवासाठी होणारा संपूर्ण खर्च आता दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी वळविण्यात येणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. कोपरी परिसरातील अष्टविनायक चौकात दरवर्षी आकर्षक रोषणाई आणि विविध कार्यक्रमांनी दिवाळी मोठ्या जल्लोषात साजरी केली जाते. मात्र, यंदा आनंद साजरा करण्यापेक्षा संकटात सापडलेल्या आपल्या बांधवांना मदतीचा हात देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत शिवसेनेने हा उत्सव रद्द केला आहे. रोषणाई आणि जल्लोष करण्यापेक्षा अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या घरात मदतीचा दिवा पेटविणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी भावना व्यक्त करत, दुष्काळग्रस्तांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा शिवसैनिकांचा संकल्प असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी पंत यांच्या संकल्पनेतून दुष्काळावर मात करण्यासाठी 'मोफत चारा वाटप केंद्र'



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०६, चंद्रपूर : जिल्ह्यात दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या मानव-वन्यजीव संघर्षाला रोखण्यासाठी आणि दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांना मोठा दिलासा देण्यासाठी चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने एक अत्यंत क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या संकल्पनेतून मोहर्ली वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय येथे दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ 'मोफत चारा वाटप केंद्राचा' उद्घाटन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमामध्ये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक (बफर) विशाल माळी, सहाय्यक वनसंरक्षक (बफर) संकेत वाटोरे, संतोष थिपे, वनपरिक्षेत्र अधिकारी मोहर्ली, जुनोना, भामडेळी, सितारामपेठ, कोंडेगाव, मुधोली, टेकाडी, अडेगाव, आगरझरी व देवाडा येथील सरपंच, पोलीस पाटील, इको विकास समिती अध्यक्ष/सचिव, सितारामपेठ येथील मातृशक्ती महिला, पर्यटन व्यवस्थापक मार्गदर्शक, पीआरटी सदस्य उपस्थित होते. चारा वितरण केंद्र उभारणे ही जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची संकल्पना असून, जिल्ह्यातील सर्व वनक्षेत्रात चारा वितरण केंद्र उभारणी करुन पशुपालक व शेतकरी यांना मोफत वाटप करणे यामुळे दुष्काळग्रस्त भागातील पाळीव प्राण्यांचा चाऱ्याचा प्रश्न सुटणार असून जिल्ह्यामध्ये असलेल्या वनक्षेत्रातील फायर लाईनवरील गवत न जाळता सदर गवत स्थानिकांना उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

श्रीधरराव मालेकर यांना कोरपना तालुका रत्न पुरस्कार

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०६, चंद्रपूर : सामाजिक, प्रशासकीय, शैक्षणिक व ग्रामीण विकास क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे तथा जिल्हा परिषद, चंद्रपूरचे सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधरराव नामदेव मालेकर यांना 'स्टुटंड फर्म ग्रुप कोरपना' यांच्या वतीने प्रतिष्ठेचा 'कोरपना तालुका रत्न पुरस्कार २०२६-२७' जाहीर करण्यात आला आहे.

श्रीधरराव मालेकर यांनी आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवाकाळात विविध महत्त्वपूर्ण पदांवर कार्य करताना ग्रामीण विकास, जलसंधारण, स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आजिवीका अभियान तसेच पर्यावरणपूरक ग्रामविकास, व्यसमुक्ती अभियान आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविणे, विकासाचे नियोजन करणे आणि शासकीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे, अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

प्रशासन, विकास आणि व्यवस्थापन क्षेत्रातील त्यांचा अनुभव, अभ्यासपूर्ण दृष्टिकोन, कार्यतत्परता आणि समाजाभिमुख विचारसरणी ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आहेत. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही समाजाच्या विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन व योगदान प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन 'स्टुटंड फर्म ग्रुप कोरपना ' यांनी त्यांची 'कोरपना तालुका रत्न पुरस्कार २०२६-२७' साठी निवड केली आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक व प्रशासकीय कार्याचा यथोचित गौरव झाला असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच प्रभावी नियोजन करा - जिल्हाधिकारी

धानाची कापणी यंत्राऐवजी मनुष्यबळाद्वारे करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करा



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०६, चंद्रपूर : जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात जनावरांना चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी आतापासूनच व्यापक आणि प्रभावी नियोजन करणे आवश्यक आहे. विशेषतः धान कापणीनंतर उपलब्ध होणारे तणीस वाया जाणार नाही, याची दक्षता घेऊन त्याचा जनावरांच्या चाऱ्यासाठी जास्तीत जास्त उपयोग करावा. यासाठी शेतकऱ्यांनी हार्वेस्टर यंत्राऐवजी शक्यतो मनुष्यबळाद्वारे धानाची कापणी करण्यास प्राधान्य द्यावे. तसेच चारा उत्पादन, संवर्धन आणि साठवणुकीसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिले.

जिल्ह्यातील संभाव्य चारा टंचाईच्या अनुषंगाने चारा उत्पादन व व्यवस्थापनाच्या नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, उपजिल्हाधिकारी संजय पवार, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.सुरेश कुंभरे, मृद व जलसंधारण अधिकारी नीलिमा मंडपे, विभागीय वन अधिकारी राजन तलमले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी वसुमना पंत म्हणाल्या की, हार्वेस्टर यंत्राद्वारे धानाची कापणी केल्यास मोठ्या प्रमाणात तणीस शेतातच राहते किंवा त्याचा चाऱ्यासाठी पुरेसा उपयोग होत नाही. मात्र मनुष्यबळाद्वारे कापणी केल्यास तणीस व्यवस्थित गोळा करून जनावरांसाठी चारा म्हणून वापरता येते. त्यामुळे शेतकऱ्यांना दोन्ही पद्धतींमधील फरक प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगावा.यासाठी प्रायोगिक तत्त्वावर पाच गावांची निवड करून जनजागृती उपक्रम राबवावेत. त्यानंतर प्रत्येक तालुक्यातील किमान दहा गावांमध्ये कृषी, पशुसंवर्धन, महसूल, ग्रामविकास व वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करावे.

पुढे त्या म्हणाल्या, उपलब्ध चाऱ्याचा अपव्यय टाळण्यासाठी कडबाकुट्टी यंत्रांचा अधिकाधिक वापर करण्यावर भर द्यावा. विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त शेतकरी व पशुपालकांना विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्रांचा लाभ मिळवून द्यावा.

कमी पाण्यात चारा उत्पादनासाठी हायड्रोपोनिक पद्धतीने मका चारा निर्मितीला प्रोत्साहन द्यावे. विशेषतः पाण्याची मर्यादित उपलब्धता असलेल्या पशुपालकांना या तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून त्याचे फायदे सम जावून सांगावेत. आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि दृकश्राव्य माध्यम ांच्या साहाय्याने चारा उत्पादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

२ वर्षांची प्रतीक्षा संपली ! १४ गावातील पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना नवी मुंबई महापालिकेचा पहिला पगार

नगरसेवक भरत भोईर यांच्या पाठपुराव्याला यश; दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांच्या हातात हक्काचा पगार



अक्षराज : विनोद वास्कर

दि.०५, दहिसर (ठाणे) : नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट झालेल्या १४ गावातील पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना अखेर त्यांचा हक्काचा पहिला पगार मिळाला आहे. तब्बल दोन वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर कर्मचाऱ्यांच्या हातात पगार पडल्याने यंदाची दिवाळी त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने आनंदाची ठरणार आहे.

साडेआठ हजार पगार ही वेळेवर नाही, तरीही काम चालूच

गेली दोन वर्षे या कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नव्हता. त्यांचा पगार फक्त साडेआठ हजार रुपये इतकाच होता, तो सुद्धा व्यवस्थित मिळत नव्हता. कधी पगार मि ळायचा, तर कधी मिळायचाच नाही. तरीसुद्धा या कर्मचाऱ्यांनी इमानदारीने पाणीपुरवठ्याचे आपले काम अखंडपणे चालू ठेवले होते. गावातील लोकांना पाणी मिळावे म्हणून त्यांनी कधीच काम थांबवले नाही. त्यांच्या या त्यागामुळेच आज त्यांचा सन्मान होत आहे.

पाणीपुरवठा विभागात एकूण ३२ कामगार कार्यरत आहेत. त्यापैकी आज ३१ कर्मचाऱ्यांना पगाराचे वाटप करण्यात आले. या पगाराचे वाटप नगरसेवक भरत भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. दिवाळीच्या तोंडावर अर्धा पगार का होईना, पण हातात पडल्याने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

भरत भोईर यांचा सतत पाठपुरावा

गेली २ वर्षे या कर्मचाऱ्यांना पगार मिळत नव्हता. यासाठी नगरसेवक भरत भोईर हे राज्याचे वनमंत्री गणेश जी नाईक साहेब, महापौर सुजाता पाटील, सभापती सागर नाईक यांच्याकडे सतत पाठपुरावा करत होते. यासोबतच १४ गावातील इतर नगरसेवक सुद्धा यासाठी प्रयत्न करत होते. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे अखेर हा प्रश्न मार्गी लागला आणि कर्मचाऱ्यांना नवी मुंबई महापालिकेचा पहिला पगार मिळाला.

यावेळी कर्मचाऱ्यांनी भरत भोईर यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधींचे आभार मानले. दोन वर्षांनंतर हक्काचा पगार मि ळाल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी आता आनंदाने साजरी होणार आहे.

दीपोत्सवाच्या शुभेच्छा देत जलसजग, प्रदूषणमुक्त, पर्यावरणशील दिवाळी साजरी करण्याचे महापौर, आयुक्त यांचे नवी मुंबईकरांना आवाहनपत्र

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०६, नवी मुंबई : नवी मुंबई शहर अत्यंत जबाबदार वर्तणुक असणाऱ्या नागरिकांचे संवेदनशील शहर म्हणून नावाजले जाते. त्या अनुषंगाने सध्या एल निनो मुळे ओढावलेली हवामानाची जागतिक परिस्थिती लक्षात घेता या दीपावली कालावधीत पाण्याचा काळजीपूर्वक उपयोग करून जलबचत करणे तसेच फटाक्यांम ुळे वायू प्रदूषण होणार नाही याची काळजी घेणे अपेक्षित असून त्यादृष्टीने नवी मुंबईकर नागरिकांनी जागरूकतेने सहकार्य करावे असे आवाहन नवी मुंबईच्या महापौर श्रीम. सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त यांनी सर्व सोसायट्या, वसाहती यांना पत्र देऊन केले आहे.

सध्या भारत देश व जगातील बहुतेक भागामध्ये एल निनोचे सावट असून, यामुळे पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे तसेच पर्जन्यवृष्टीतही मोठ्या प्रमाणात अनियमितता आलेली आहे. त्याचप्रमाणे सरासरी तापमानातही मोठ्या प्रमाणात वाढ होऊन जलद बाष्पीभवनामुळे धरण व जलाशय अशा पिण्याच्या पाणीसाठ्यामध्ये दिवसागणिक प्रचंड घट होत आहे.

त्यासोबतच आपल्या दैनंदिन उपक्रमांमुळे हवेचे प्रदूषण व पुढे येणा-या उत्सव काळात फटाक्यांमुळे त्यामध्ये होणारी वाढ याचा मानवी जीवनावर गंभीर परिणाम होताना दिसत आहे. विशेषत: नवजात बालके, गरोदर माता, वयोवृध्द नागरिक यांच्या आरोग्यावर याचे दुष्परिणाम होत आहेत. त्यामुळे प्रदूषण रोखणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने नवी मुंबईतील नागरिकांना चला, पाणी वाचवूया, प्रदूषण टाळूया, आपले नवी मुंबई शहर अधिक पर्यावरणशील बनवूया! – असे आवाहन करीत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ही दीपावली सर्व नागरिकांना सुख-समृध्दी व ऐश्वर्य प्रदान करणारी जावो अशी आवाहनपर शुभेच्छापत्रे पाठविली आहेत.

खराटपेठ येथे शिवमंगल जिनिंग अँड प्रेसिंग युनिटमध्ये कापूस खरेदीचा शुभारंभ

सुपर कॉटनला प्रतिक्विंटल ८८७२ रुपये दर; शेतकऱ्यांसाठी आधुनिक सुविधांची उपलब्धता



अक्षराज : संतोष बांदूरकर

दि.०६, गोंडपिपरी (चंद्रपूर) : शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळावा, त्यांच्या शेतमालाची पारदर्शक पद्धतीने खरेदी व्हावी आणि त्यांना स्थानिक स्तरावरच उत्तम सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने खराटपेठ येथीलशिवमंगल जिनिंग अँड प्रेसिंग युनिटमध्येशुक्रवार, दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी कापूस खरेदीचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सुपर कॉटनसाठी प्रतिक्विंटल ८८७२ रुपये दर जाहीर करण्यात आला.या शुभारंभाला आमदार देवरावदादा भोंगळे आणि दीपक सातपुते (गोंडपिपरी) यांची प्रम ुख उपस्थिती होती. युनिटचे संचालक नीलकंठ गौरकर, नितेश पावडे, विजय गुरनुले, अविनाश वाभिटकर, विवेक काकडे आणि गणेश वाभिटकर यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.कार्यक्रम ाच्या व्यासपीठावर जिनिंग अँड प्रेसिंगचे अध्यक्ष जीवतोडे साहेब, भगिरथ पावडे, रवींद्र हेपट, शांताराम काळे, संजय वागदरकर, खेवले सर, प्रकाश काळे, माधव लडके, भास्कर गायकवाड, सौ. पावडे, सौ. वाभिटकर, राव गुरुजी, खर्डीवार साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी कापसाच्या पहिल्या वाहनाचे विधिवत पूजन करून खरेदीला प्रारंभ करण्यात आला. पहिला कापूस घेऊन आलेल्या शेतकऱ्याचा आमदार देवरावदादा भोंगळे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी अशा स्थानिक कृषीपूरक उद्योगांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे अधोरेखित केले.

या युनिटमुळे परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जवळच कापूस विक्रीची उत्तम सुविधा उपलब्ध झाली आहे. विशेष म्हणजे, येथे कापसासोबतच धान, सोयाबीन, चणा, मूग, उडीद आणि मका या शेतमालाचीही खरेदी करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट दर्जाचे जिनिंग व प्रेसिंग, शेतम ालाला योग्य दर, पारदर्शक देवाणघेवाण आणि गुणवत्तेची हमी या माध्यमातून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्याचा संकल्प संचालक मंडळाने व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष बांदूरकर यांनी केले. परिसरातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

१४ गावांच्या विकासाला नवी गती ! दहिसर नाका - बेलापूर बस सेवेचा शुभारंभ

नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून २ नवीन मार्ग सुरू; हजारो प्रवाशांचा प्रवास होणार सोयीस्कर

अक्षराज : विनोद वास्कर

दि.०६, दहिसर (ठाणे) : १४ गावांच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातर्फे उत्तरशिव गाव (म्हाडा) ते घणसोली आणि दहिसर नाका ते बेलापूर या दोन नवीन बस मार्गांचा शुभारंभ नुकतेच करण्यात आला. या बससेवेचे उद्घाटन उत्तरशिव गाव आणि दहिसर नाका येथे नवी मुंबईच्या महापौर सुजाताताई सुरज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या मार्गावर थेट बससेवा नसल्याने १४ गावातील नागरिक, विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी यांना अनेक वेळा बस बदलावी लागत होती, वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात होता. ही अडचण लक्षात घेऊन प्रभाग १४ चे नगरसेवक भरत कृष्णा भोईर यांनी दिनांक २२/०४/२०२२ रोजीच परिवहन सभापती विकासजी झांजाड यांच्याकडे दहिसर नाका ते वाशी सी.बी.डी. बेलापूर बससेवा सुरू करण्याची लेखी मागणी केली होती. त्या पाठपुराव्याला



अखेर यश आले असून, नागरिकांची अनेक दिवसांची मागणी पूर्णत्वास गेली आहे. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या शुभारंभ प्रसंगी परिवहन सभापती विकासजी झांजाड, प्रभाग समिती सभापती भरत भोईर, नगरसेवक शशिकांत भोईर, नगरसेविका प्रतीक्षा पाटील, वार्ड अधिकारी नवसारे, समाजसेवक रोहित भोईर, कल्याण जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण पाटील, मंडळ अध्यक्ष सुनिल म्हस्कर, जिल्हा सचिव रमेश पाटील, करण पाटील, मंडळ सचिव गुरुनाथ पाटील, मनोज पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा कांचन पाटील, सुषमा पाटील, अश्विनी पवार, किसन जाधव, जगन्नाथ पाटील, चेतन पाटील, रामनाथ मुकादम, गौतम खुटारकर, जयेश पाटील, अविनाश म्हात्रे, आत्माराम गोरपेकर, सचिन पाटील, प्रदीप साळुंखे, प्रदीप पाटील, अक्षय पाटील, तेजस पाटील, राजेश पाटील, गजानन पाटील, संतोष पाटील, कमलाकर पाटील, हरिभाऊ पाटील, विकास गोले, सुरेश राठोड यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होणार

या नवीन बससेवेमुळे १४ गावांतील नागरिकांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार असून, सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा सन्मान म्हणजे निर्भीड पत्रकारितेचा गौरव' - कुणाल दराडे

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.०६, विंचूर (नाशिक) : सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रांतील घडामोडी अहोरात्र जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतात. समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. याच भावनेतून विंचूर येथील 'हॉटेल शेतकरी' येथे समाजसेवक कुणाल दराडे यांच्या वतीने पत्रकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न, समस्या, विकासकामे तसेच जनसामान्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत कुणाल दराडे यांनी उपस्थित पत्रकारांना शाल, श्रीफळ, तसेच मिठाई आणि भेटवस्तू देऊन गौरव केला.

यावेळी पत्रकार सुनील क्षिरसागर, मच्छिंद्र साळुंके, राजेश भडांगे, दत्तात्रय दरेकर, रोहन सरोदे, अभय पाटील, जनार्दन चव्हाण, संदीप धनवटे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच पत्रकारांच्या सामाजिक योगदानाचे उपस्थित मान्यवरांकडून भरभरून कौतुक करण्यात आले. लोकशाहीचा आवाज बनण्याचे प्रभावी साधनपत्रकारिता हे केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून समाजातील सामान्य माणसाचा आवाज बनण्याचे प्रभावी साधन आहे. समाजातील चांगल्या कामांना प्रसिद्धी देतानाच अन्याय, अत्याचार आणि नागरिकांच्या समस्यांवर प्रकाश टाकण्याची महत्त्वाची जबाबदारी पत्रकार पार पाडत



असतात, असा सूर याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. पत्रकारांचा सन्मान हा त्यांच्या लेखणीचा आणि समाजाप्रती असलेल्या योगदानाचा खरा सन्मान असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली.या कार्यक्रमास नाना जेऊघाले, इम्रान मोमीन, दिलीप चव्हाण, सुलतान पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा सन्मान!

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा सन्मान करणारे नेतृत्व समाजात नेहमीच सकारात्मक संदेश देत असते. पत्रकारांचा सन्मान हा केवळ व्यक्तीचा गौरव नसून समाजातील निर्भीड आणि जबाबदार पत्रकारितेचा हा गौरव आहे.

– कुणाल दराडे, समाजसेवक, येवला.

२५ कोटीच्या निधीतून राजूरा शहराचा होणार कायापालट; आ.भोंगळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०६, राजूरा (चंद्रपूर) : राजूरा शहरातील मुख्य रस्त्यांवरुन होणारी अवजड वाहतूक आणि त्यामुळे झालेली रस्त्यांची प्रचंड दुरावस्था ही स्थानिक नागरिकांसाठी व वाहन धारकांसाठी गेल्या अनेक वर्षापासून डोकेदुखी ठरत होती. धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले होते. हीच गंभीर समस्या ओळखून आ. देवराव भोंगळे यांनी विशेष पुढाकार घेत केंद्रीय महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांचेकडे सातत्यपूर्ण पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु केला. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण आणि खंबीर पाठपुराव्याला मोठे यश आले असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने राजूरा शहरातील मुख्य मार्गाच्या कामासाठी तब्बल २५ कोटी २ लाख २६ हजार २३९ रुपयांच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

या विकासकामांतर्गत राजूरा शहरातील अत्यंत वर्दळीच्या मानल्या जाणाऱ्या बिरसा मुंडा चौक ते रेल्वे फाटक आणि बिरसा मुंडा चौक ते भवानी माता मंदिर या दोन्ही मुख्य मार्गावर एकूण ९.०२४ किलोमीटर लांबीच्या प्रशस्त सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे दुतर्फा बांधकाम करण्यात येणार आहे. शहरातील वाहतूक अधिक सुरळित, सुटसुटीत आणि शिस्तबध्द व्हावी, यासाठी या रस्त्याच्या मधोमध आकर्षक दुभाजक उभारले जाणार आहेत. तसेच रात्रीच्या वेळी प्रवाशांना आणि स्थानिकांना कोणताही त्रास होऊ नये. यासाठी ५८ प्रमुख ठिकाणी आधुनिक पथदिवे बसवले जातील. वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन व्हावे यासाठी ठिकठिकाणी दिशादर्शत व माहिती फलक लावले जाणार आहेत. याशिवाय पावसाळ्यात

पाणी साचून रस्त्याची दैना होऊ नये यासाठी ५,३५० मीटर लांबीच्या भक्कम ड्रेनेज व नाल्यांचे बांधकामही या निधीतून केले जाणार आहेत. मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्वाच्या रस्त्याच्या कामाला आ. देवराव भोंगळे यांच्या प्रयत्नामुळे अखेर प्रशासकीय मंजुरी मिळाली असून प्रत्यक्ष कामाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यामुळे राजूरा शहरातील वाहतूक समस्या कायमची सुटणार असून दळणवळणाला मोठी गती मिळणार आहे. शहराच्या या धडक विकासकामाबद्दल आणि दुरदृष्टीबद्दल राजूरा शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी आ. देवराव भोंगळे यांचे मनापासून आभार मानले आहे.

३२ वा गोपीकृष्ण संगीत महोत्सव धडाक्यात साजरा !

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०६, ठाणे : श्री गणेश कल्चरल ॲकॅडमी तर्फे सादर होणाऱ्या गोपीकृष्ण संगीत महोत्सवाचे हे ३२वे वर्ष. ऐन दिवाळीच्या उंबरठ्यावर संपन्न झालेल्या या महोत्सवात आलेल्या कलाकारांच्या सादरीकरणाने खरंच रसिकांच्या कानाचे आणि डोळ्यांचे पारणे फ ेडले. दिवाळीच्या फटाक्यांची लडी कशी एकदा सुरू झाली की शेवटपर्यंत कडकडून वाजते आणि सगळा आसमंत त्याने दुमदुमून जातो, तोच अनुभव या वर्षीच्या महोत्सवात आला. आणि त्याला गुरुतत्त्वाचे उदंड आशिर्वाद मिळाले.

पहिल्या दिवशी ३१ ऑक्टोबरला या लडीची सुरूवात भारतातल्या युवा पिढीतील अग्रणी तबलावादक ओजस अधिया यांच्या तबलावादनाने झाली. अजराडा घराण्याचे बारकावे, लयकारी आणि विशेषता दाखवत त्यांनी सुरुवातीलाच कार्यक्रम उच्च पातळीवर नेऊन ठेवला. त्यांना लेहऱ्यावर तितकीच सुरेल आणि लयदार साथ केली होती सुधांशु घारपुरेंनी. आणि हे पहायला ओजसजिंचे गुरू आणि अजराडा घराण्याचे विद्वान् पंडित मृदंगराज जी उपस्थित होते. तत्पश्चात, वयाने ज्येष्ठ परंतु तरुणाईच्या तडफेने कथ्थक नृत्य सादर केले ते श्रीमती दुर्गा आर्या यांनी. त्यांनी सादर केलेल्या विविध उपज रचना, भावांग आणि ओघवती वाणी यामुळे रसिक अक्षरशः मुग्ध झाले. त्यांना तितकीच तोलामोलाची तबलासंगत केली



होती तालमणी पं. मुकुंदराज देव आणि रोहित देव यांनी. त्यांच्या जुगलबंदी आणि सवाल – जवाबाने तर उच्चबिंदू गाठला. मुकुंदराज देव हे पंडित मृदंगराज यांचे ज्येष्ठ शिष्य. तब्येतीमुळे जास्त बसवत नसून सुद्धा, मेरे छोटे बेटे का तबला सुना, लेकीन बडे बेटे का तबला सुनेबिना मैं कही नहीं जाऊंगा, असं सांगत मृदंगराजजी संपूर्ण कार्यक्रम उपस्थित होते. गायन – संवादिनी वर श्रीरंग टेंबे आणि सतारीवर जुबेर शेख यांची संगत अत्यंत पूरक होती.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर आदरणीय गुरूजी पंडित मृदंगराज जी आणि नुकत्याच महामहोपाध्याय उपाधीने सन्मानित झालेल्या नृत्यगुरू डॉ. सौ. मंजिरी देव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्रीराम देव, नरेश म्हस्के, श्रीमती मृणाल पेंडसे, पितांबरीचे रवींद्र प्रभुदेसाई, लॉर्बिडियाचे श्री. भालेराव, टिपटॉप प्लाझाच्या श्रीमती स्मिता शहा आदि मान्यवर उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी या सांगीतिक उच्चांकाचा आलेख पुढे न्यायची पहिली मेढ रोवली ती सौ. मंजुषा पाटील यांनी. अत्यंत तयारीच्या, दमसासाच्या आणि स्वच्छ तानांचा पाऊसच पाडला. त्यावर कळस म्हणजे त्यांचे विशिष्ट शैलीने गायलेले जोहार मायबाप जोहार..... रोहित देव आणि सिद्धेश बिचोलकर यांच्या साथीने आणखीन रंगत वाढवली.

त्यानंतर ज्येष्ठ सरोदवादक पद्मश्री पं. तेजेंद्र नारायण मजुमदार यांच्या सरोदवादनाने एका वेगळ्याच वादनशैलीचा अनुभव दिला. मोराचे पीस गालावरून हळुवार फिरावे इतकं मुलायम वादन. त्यांना तशीच नजकतदार साथ दिली पंडित मुकुंदराज देव यांनी.

आणि सर्वात शेवटी विधा लाल आणि गौरी दिवाकर यांच्या स्वतंत्र आणि जोड नृत्याने तर यंदाच्या महोत्सवाचा शिरोबिंदू गाठला. उत्तम तयारी, ताळमेळ आणि प्रभावी मांडणी यामुळे कार्यक्रमाची सांगता अतिशय समर्पक पद्धतीने झाली. त्यांना पंडित मुकुंदराज देव आणि रोहित देव यांची झंझावाती तबलासाथ लाभली. महावीर गंगाणी यांनी पखवाज तर वैभव मांकड, श्रीरंग टेंबे आणि जुबेर शेख यांनी अनुक्रमे गायन, संवादिनी आणि सतार यांची उत्तम सांगत केली.

यावर्षी पूर्णत्वाची तृप्ती करून पुढच्या वर्षीच्या महोत्सवाची आस पल्लवित करत या महोत्सवाची सांगता झाली.

थोडक्यात बातम्या

शहापूरमध्ये १० नोव्हेंबरला 'बळी पहाट' सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन; मनोरंजनातून सामाजिक प्रबोधनाचा जागर

अक्षराज : सुनिल फर्डे

दि.०६, शहापूर (ठाणे) : सम्राट बळीराजाचा इतिहास, शेतकरी-कामगारांची संस्कृती आणि ओबीसी समाजाच्या सामाजिक अस्मितेचा जागर घडविणारा 'बळी पहाट' हा सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी शहापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. ओबीसी संघर्ष समिती, ठाणे यांच्या वतीने आणि राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तुत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सकाळी ६.३० वाजता गंगा देवस्थान हॉल, वाफे, शहापूर येथे पार पडणार आहे. मनोरंजनासोबतच सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक प्रबोधनाचा संदेश देणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

सम्राट बळीराजाचा खरा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, शेतकरी व काम गार वर्गाच्या अस्सल संस्कृतीचे दर्शन घडविणे, तसेच या संस्कृतीशी निगडित गीते, धमाल नृत्य आणि मनोरंजनाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृती करणे, असा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

राजमाता जिजाऊ कलामंच यंदा सलग सहाव्या वर्षी 'बळी पहाट' कार्यक्रम सादर करणार असून, यावेळी नव्या संकल्पना आणि वेगळ्या सादरीकरणातून प्रेक्षकांना सांस्कृतिक मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. ओबीसी समाजातील विविध प्रश्न, सामाजिक विषय आणि सांस्कृतिक वारशाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. या सांस्कृतिक सोहळ्याला शहापूर परिसरातील नागरिक, शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ओबीसी संघर्ष समिती, ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पाटणसावंगी कोळसा खाणीत कर्मचाऱ्याचा मृत्यू

कन्व्हेयर बेल्ट परिसरात बेशुद्धावस्थेत आढळला मृतदेह

अक्षराज : दिवाकर घेर



दि.०६, नागपूर : नागपूर क्षेत्रीयवेकोलिच्या पाटणसावंगी कोळसा खाणीत कर्तव्यावर असताना एका ४० वर्षीय कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला. ही घटना दिनांक ०५ नोव्हेंबर दुपारी घडली. या घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जगदीश सुरेश आसुटकर (४०, रा. वेकोलि वसाहत, पाटणसावंगी), असे मृतक कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते मूळचे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील चरूरखटीचे रहिवासी होते. मागील अडीच वर्षांपासून ते वेकोलिमध्ये जनरल असिस्टंट म्हणून कार्यरत होते. ते नेहमीप्रमाणे जनरल शिफ्टमध्ये काम करताना कन्व्हेयर बेल्ट यंत्रणा परिसरात अचानक कोसळले. तातडीने सहकारी कामगारांनी व्यवस्थापनाला माहिती दिली. त्यानंतर वलनी येथील वेकोलि रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.आसुटकर यांचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाला की कामा दरम्यान अपघात झाला, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. स्थानिक पोलीस व वेकोलि अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. प्रकरणाची निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करून सुरक्षा यंत्रणेचे तातडीने ऑडिट करावे अशी कामगार संघटनेची मागणी आहे.

चंद्रपूर कृउबा समितीला बल्लारपूर तालुक्यातील धान खरेदी केंद्र जोडा

कृउबा समितीचे सभापती गंगाधर वैद्य : भद्रावती व वरोरा तालुका वगळा

अक्षराज : वसंत वडस्कर

दि. ०६ विसापूर (चंद्रपूर) : चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र चंद्रपूर व बल्लारपूर तालुके आहेत. मात्र, चंद्रपूर जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी खरीप हंगाम २०२६-२७ अंतर्गत आधारभूत किंमत खरेदीसाठी धान (भात) पिकाला बल्लारपूर तालुका वगळला आहे. यामुळे बल्लारपूर तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीसाठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे भद्रावती व वरोरा तालुके याच बाबीसाठी चंद्रपूर बाजार समितीच्या कक्षेत आणण्याचा प्रकार केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याची वेळीच दखल घेऊन बल्लारपूर तालुका चंद्रपूर कृउबा समितीला धान उत्पादक शेतकऱ्यांच्या सोईसाठी जोडण्यात येऊन भद्रावती व वरोरा तालुका वगळा, अशी मागणी चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर वैद्य यांनी केली आहे.

चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र चंद्रपूर व बल्लारपूर तालुक्यात आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या संख्येने सोईचे आहे. हमीभाव धान खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी लागते. सातबारा, ई-पिक पाहणी, सामाईक संमतीपत्रे आदी दस्ताऐवज शेतकऱ्यांना ऑनलाईन करावे लागते. ही प्रक्रिया चंद्रपूर व बल्लारपूर तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना सोईची ठरते. परंतु जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी खरीप हंगाम धान खरेदी साठी २०२५-२६ मध्ये चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सोबत भद्रावती व वरोरा तालुके जोडले होते.

विशेष म्हणजे भद्रावती व वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केंद्र आदिवासी विकास महामंडळाच्या मार्फत करण्याची सुविधा असताना चंद्रपूर बाजार समिती ला का जोडण्यात आले. हा प्रकार शेतकऱ्यांना त्रास देणारा आहे. यामुळे जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी बल्लारपूर तालुका धान उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने चंद्रपूर बाजार समितीच्या कक्षेत असणे गरजेचे आहे.

जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून मुक्त करण्यासाठी खरीप हंगाम २०२६-२७ मधील आधारभूत किंमत योजनेतर्गत धान खरेदी केंद्रावर बल्लारपूर तालुका जोडण्यात यावा. त्याच प्रमाणे चंद्रपूर बाजार समितीच्या कक्षेबाहेरील भद्रावती आणि वरोरा तालुके वगळण्यात यावे, अशी मागणी चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर वैद्य यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.